५/९३

# भाडेकरारनामा भेकराईनगर

लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा दिनांक २८ माहे नोव्हेंबर २०२२

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि तर्फे
मा. डॉ. चेतना केरूरे
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकरशेठ रोड,स्वारगेट
पुणे –४११०३७
यांचे तर्फे श्री.डी.डी.जाधव प्र.असि.विधी अधिकारी
तथा मालमत्ता विभाग,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि

यांसी

श्री/श्रीमती **गोवर्धन चंद्रकांत खोमणे**
वय:२४ वर्षे
राहणार जय मल्हार रोड, उरूळी कांचन ता. हवेली जिल्हा,
पुणे– ४१२२०२

सदर करारनामा हा आज दिनांक १५/११/२०२२ रोजी पुणे येथे करण्यात येत आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या भेकराईनगर डेपो येथिल सेवकांकरीता कॅन्टिन सुविधा उपलब्ध करून देणे फॅक्टरी ॲक्टनुसार आवश्यक असल्याने कॅन्टिन चालविण्यासाठी कॅन्टिनची जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स पद्धतीने देणेबाबत निविदा प्रक्रिया करण्यात आली असून त्यामध्ये जास्तीत जास्त निविदा रक्कम रूपये ------------ प्राप्त झाली आहे. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेस अनुसरून भेकराईनगर डेपो येथिल कॅन्टिनसाठी जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स पद्धतीने २०० चौ. फूट क्षेत्राची जागा ३ वर्षाचे कालावधीसाठी खाद्य पदार्थाची विक्री करण्यास व कॅन्टिनच्या जागेची लायसन्स फी म्हणून दरमहाचे भाडे रक्कम रूपये १०,०००/– अधिक १८ टक्के जीएटी असे एकूण ११,८००/– इतके होत असून सदरचे भाडे ३ वर्षे कालावधीसाठी लिहून देणार यांनी मान्य, कबूल व स्विकृत केलेले आहे. तसेचे मान्य निविदेतील अटी व शर्ती यांना अधिन राहून खालिलप्रमाणे जाहिर करीत आहे व स्वखूषीने लिहून देत आहे.

अ) मिळकतीचे वर्णन :– तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली मे. दुय्यम निबंधक हवेली यांचे कार्यक्षेत्रातील सि.स.नं . १७५/४/५/९ मधील खालिल नमूद केलेल्या चतु:सिमा, पुणे महानगर परिवहन महाममंडळाच्या मालकीचे भेकराईनगर डेपो पुणे ४१२३०७ येथिल २०० चौ. फूट कॅन्टिन क्षेत्राची जागा ही मिळकत सदर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याचा विषय आहे.

यांची चतु:सिमा खालिलप्रमाणे–

पुर्वेस – रस्ता

पश्चिमेस – भेकराईनगर डेपो

दक्षिणेस – डेपोची भिंत

हवेल – २
२०६३६ / ५/९०
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
दुय्यम निबंधक हवेली क्र. २ यांची 2022

उत्तरेस — भेकराईनगर डेपो बस स्टॅण्ड

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत

ब) वर कलम अ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मालकी हक्काची व वहिवाटीची असून सदरची मिळकत लिव्ह ॲण्ड लायसन्सचे कराराने देण्याचा पुणे महानगर परिवहन महामंडळास पुर्णपणे अधिकार असून सदरची मिळकत ही लिहून देणार यांना त्यांनी मागणी केल्यावरून दरमहा भाडे रक्कम रूपये १०,०००/— अधिक १८ टक्के जिएसटी असे एकूण ११,८००/— इतके भाडे (म.न.पा व इतर कर वगळून) ३ वर्षे कालावधीकरीता राहिल.

क) लिहून देणार यांनी अनामत रक्कम रूपये ६०,०००/— ही पावती क्र ८२३६६ दिनांक ०३/०६/२०२२ ने महामंडळाकडे जमा केलेले आहे. सदरची अनामत रक्कम लिहून घेणार यांचेकडे लिव्ह ॲण्ड लायसन्सच्या मतुदतीपर्यत जमा राहील व मुदत संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**करारातील अटी शर्ती खालिलप्रमाणे :**

१) लिहून घेणार पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ही प्रवाशांना वाहतूकीची सेवा उपलब्ध करून देणेसाठी स्थापन झालेली कंपनी असून तीचा नोंदणी क्रमांक U60210PN2007PLC130461 हा आहे. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता पीएमपीएमएल कार्यालय,शंकरशेठ रोड, स्वारगेट,पुणे ४११०३७ असा आहे. मा.सहव्यवस्थापकीय संचालक यांना कंपनीतर्फे करार करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

हवल - २
२०६३६ ६/१७
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
हवेली क्र. २
२०२२

२) लिहून देणार श्री गोवर्धन चंद्रकांत खोमणे

३) सदर लिव्ह ॲण्ड लासेसन्स कराराची मुदत दिनांक १५/११/२०२२ ते १४/११/२०२५ या ३ वर्षे कालावधीसाठी राहील.

४) लिहून देणार यांनी भाडयाने घेतलेल्या जागेचे दरमहाचे आगाऊ भाडे इंग्रजी महिन्याप्रमाणे प्रती १० तारखेच्या पूवी परिवहन महामंडळाकडे अदा करणे आवश्यक राहील.परिवहन महामंडळाकडे सदर मिळकतीकामी अदा करावयाचे मासिक भाडयाच्या रकमेमधून कोणत्याही स्वारूपाची वजावट लिहून देणार यांना करता येणार नाही हे मासिक भाडे करारातील ठरलेल्या अटी शर्तीनुसार पूर्ण रकमेने अदा करणे आवश्यक राहील.

५) निविदेतील अट क. ५ अन्वये पहिल्या ३ वर्षाचे कालावधीनंतर पुढील ३ वर्षाचे कालावधीकरीता मुळ भाडेरकमेवर १२ टक्के दरवाढ लागू करण्यात येईल सदरची दरवाढ लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहिल.

६) लिहून देणार यांनी सदर कराराच्या मुदतीत कोण्त्याही २ महिन्याचे अथवा सलग २ महिन्याचे भाडे थकविल्यास अथवा अनियमितपणे भाडे अदा करीत आहेत असे आढळून आल्यास अथवा या करारातील कोणत्याही अटी शर्तीचे पालन करीत नसल्याचे आढळून आल्यास लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना ३ महिन्याची अगाऊ नोटीस देणे आवश्यक आहे. याबाबत लिहून देणार यांचेकडून करारातील अटींचे पालन न केल्यास कायदेशीर मार्गाने राहिलेल्या मुदतीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा रद्द करून सदरचा करार संपूष्टात आणण्याचा व कॅन्टिनचा ताबा त्वरित घेण्याचा अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहिल.तसेच लिहून देण्याऱ्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. याकामी येणारा खर्च लिहून देणार यांचेकडून अलहिदा वसूल करण्यात येईल.

७) औदयोगिक सुरक्षा कायदयाअंतर्गत कॅन्टिन चालविण्यासाठी आवश्यक असलेले नियम, कायदे इ. लिहून देणार यांचेवर बंधनकारक आहेत. सदर कायदयाचा भंग झाल्यास त्याच संपूर्ण जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील याबाबत लिहून घेणार यांचा काहीही संबंध राहणार नाही.

८) लिहून देणार यांनी दरमहा देउ केलेल्या भाडयामध्ये कोणत्याही शासकीय कराचा,जीएसटी कर,महानगरपालिकेच्या कराचा विज बिले तसेच भविष्यात लागू होणारे कर इत्यादींचा समावेश करण्यात आलेला नाही. निव्वळ देउ केलेल्या भाडयाव्यतिरिक्त जागा ताब्यात घेतल्यापासुनचे शासकीय कर, महानगरपालिकेचे कर, विज बिल वगैरेची रक्कम लिहून देणार यांनी अलहिदा स्वत: संबंधीत कार्यालयास परस्पर भरावायाची आहे. तसेच या करामध्ये वेळोवेळी होणारी वाढही लिहून देणार यांनी परस्पर भरावयाची आहे. याबाबबत लिहून घेणार यांना कोणतीही तोषीष लागणार नाही. तसेच जागा ताब्यात घेतेवेळी जागेची नासधूस केलेली आढळल्यास त्याच्या दुरुस्तीचा येणारा खर्च /तसेच लिहून देणार यांचेकडून येणे असणारी /अनामत रकमेतून वसूल करण्याचा अधिकार मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहिल.

९) परिवहन महामंडळाकडून लिव्ह ॲण्ड लायसन्सने घेतलेली जागा परिवहन महामंडळाच्या संमती शिवाय लिहून देणार यांना त्यांचे हक्क, गहाण दान, बक्षिस, भागिदारी पत्र अगर पोटभाडयाने देता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे सदरचे हक्क तबदील करता येणार नाहीत. किंवा जड जोखमेत गुंतविता येणार नाही. लिहून देणार यांनी सदर परिवहन महामंडळाच्या या मिळकतीतील क्षेत्रामध्ये त्यांचे मागणीपत्रात नमूद केल्याप्रमाणे ज्या कारणाकरीता/ उपयोगाकरीता घेतलेली आहे त्याच कारणाकरीता / उपयोगाकरीता त्याचा वापर केला पाहिजे. त्या कारणव्यतीरिक्त/उपयोगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी / उपयोगासाठी याचा वापर लिहून देणाऱ्यास करता येणार नाही.

१०) सदर कॅन्टिन जागेमध्ये लाईट/ पंखे अथवा इतर उपकरणे वापरण्यासाठी त्यांनी स्वखर्चाने विजेचे मिटर वसवून घ्यावयाचे आहे.तसेच विजेचे खपाचे बिलही स्वखर्चाने भरावायाचे आहे.स्वतंत्र विज मिटर घेण्यासाठी परिवहन महामंडळातर्फे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

११) लिहून देणार यांनी लिव्ह ॲण्ड लाससेन्स पद्धतीने घेतलेल्या जागेत करावयाच्या व्यवसायापासुन अजूबाजूला त्रास किंवा आरोग्यदृष्टया उपद्रव होणार नाही याची काळजी लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे.तसेच भाडयाने दिलेल्या जागेसभोवतालच्या मोकळया जागेचा वापर महाममंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय लिहून देणार यांना करता येणार नाही व लिहून देणार यांनी पूर्ण परवानगी न घेता मोकळया जागेचा वापर केल्याचे आढळल्यास लिहून देणार यांचे तेथिल सामान, चिज/वस्तू अतिक्रमण म्हणून उचलून आणण्याचा अधिकार परिवहन महामंमडळास राहिल व याबाबत कोणतीही तक्रार लिहून देणार यांची ऐकली जाणार नाही.

१२) परिवहन महामंडळास सदर जागेची निकट अथवा आवश्यता वाटल्यास लिहून देणार यांना ३ महिन्यच्या मुदतीची नोटीस देण्यात येईल व महिना पूर्ण झाल्यावर लिहून देणार यांना मिळकतीचा ताबा विना विलंब व पूर्व परिस्थितीत द्यावयाचा आहे. ताबा न दिल्यास सदरचा ताबा लिहून घेणार हे स्वत: घेतील व त्याचा सर्व खर्च व जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील.याबाबत लिहून देणार यांचे अर्थिक नुकसान झाल्यास त्याबाबत लिहून देणार यांनी त्याबाबतचे म्हणणे लिहून घेणार यांचेकडे सादर करून लिहून देणार यांचे अर्थिक नुकसानीची खतरजमा करून नुकसान भरपाईबाबत निर्णय घ्यावयाचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

१३) लव्ह ॲण्ड लाससेन्स पद्वतीच्या कराराची मुदत संपल्यावर जागेचा ताबा ज्या स्थितीत जागा लिहुन देणार यांनी घेतलेली आहे. त्या स्थितीत स्वत:चे सर्व सामानसुमान स्वखर्चाने काढुन जागेचा ताबा परिवहन महामंडळास देणे बंधनकारक राहील, याबाबत कोणत्याही प्रकारे मुदतवाढ अथवा सवलत देता येणार नाही.

SUB-REGISTRAR HAVELI NO. II
१०९३६/ ८/१८
२०२२

१४) लिव्ह अॅण्ड लायसेन्स पद्धतीने घेतलेल्या जागेत लिहून देणाऱ्यास पार्टिशन अथवा तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम करावयाचे असल्यास महामंडळाकडील वर्कऑर्डरप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१५) लिव्ह अॅण्ड लायसेन्स पद्धतीने घेतलेल्या जागेमध्ये तपासणी व चौकशी करण्याचा अधिकार याकामी नेमलेल्या परिवहन महामंडळाच्या संबंधीत अधिकारी/ सेवकास राहील.

१६) लिहून देणार यांनी लिव्ह अॅण्ड लायसेन्स पद्धतीने घेतलेल्या जागेचा करार नोंदणीकृत करावायाचा आहे. याकामी स्टॅम्प पेपर, मसुदा फी व रजिस्ट्रेशनचा खर्च लिहून देणार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे. याची सर्व जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहिल.

१७) लिहून देणार यांचेमार्फत तयार करण्यात येणारे खाद्य पदार्थ रोजच्या रोज ताजे व स्वच्छ पुरविणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन व पुणे म.न.पा. कडील अन्न व औषध प्रशासनाचे नियमानुसार असणे आवश्यक आहे.खाद्य पदार्थ विक्री असणेकामी आवश्यक ते शॉप अॅक्ट अथवा आरोग्य विभाग,पुणे म.न.पा. यांचेकडील परवानगी,प्रमाणपत्र लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहिल.

१८) खाद्य पदार्थासाठी वापरण्यात येणारे साहित्य चांगल्या प्रतीचे व प्रमाणित असणे आवश्यक आहे. याकामी नित्कृष्ट प्रतीचे साहित्य वापरलेले आढळल्यास व खाद्य पदार्थाचा दर्जा कमी प्रतीचा असल्यास नियमानुसार कडळ कारवाई करण्यात येईल अथवा मक्ता रद्द करण्यात येईल.

१९) कॅन्टिन परिसरातील दैनंदीन स्वच्छता लिहून देणार यांनी ठेवावयाची आहे. सांडपाणी व्यवस्था करावयाची आहे. सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन नसल्याने त्यासाठी लिहून देणार यांनी महामंडळाकडून होणाऱ्या खर्चाबाबत स्थापत्य विभागाकडून खातरजामा करून झालेल्या खर्चाबाबत समायोजन भाडे रकमेमधून करण्यात यावे.

२०) लिहून देणार यांनी पिण्याच्या पाण्यासाठी पिंप ठेवणे तसेच पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करणे आवश्यक राहील.

२१) लिहून देणार यांना व त्यांचे संबंधीत व्यक्ति अथवा कामगार इत्यादींनी परिवहन महामंडळाच्या सेवकांशी सौजन्याने वर्तन ठेवणे तसेच खाद्य पदार्थाबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

२२) लिहून देणार यांनी महामंडळाकडील सेवकांसाठी माफक दराने म्हणजेच निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे खाद्य पदार्थ पुरविणे आवश्यक आहे.

२३) ज्या कारणास्तव करारनामा करण्यात आला आहे त्याव्यतिरिक्त अन्य कारणांकरीता जागेचा वापर करता येणार नाही.

२४) खाद्य पदार्थाचा दर्जा परिवहन महामंडळ अथवा शासकीय/ म.न.पा अधिकारी यांचेकडून केव्हाही तपासण्यात येईल पदार्थाच्या दर्जाबाबत तक्रार आल्यास अथवा त्यापासुन कामगार व इतर व्यक्ती यांना पदार्थ सेवनाने त्रास झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ( हॉस्पिटल/नुकसान भरपाई इ. खर्च ) लिहून देणार यांचेवर राहिल.याबाबत तक्रारदार यांना सरकारी रूग्णालयाकडील तापासणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.तसेच प्राशन झालेला पदार्थ कॅन्टिनमधून घेतल्याबाबतचा पुरावा संबंधीत तक्रारदाराकडून सादर करणे आवश्यक रहिल.

२५) महामंडळाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे लिहून देणार यांना बंधनकारक राहिल महामंडळाचा निर्णय अंतीम राहिल.

२६) कॅन्टिनसाठीचा पाणीपुरवठा लिहून घेणार यांचेकडून करण्यात येईल.परंतू काही कारणास्तव म.न.पा. कडील पाणीपुरवठा बंद असल्यास लिहून देणार यांनी स्वखर्चाने पाण्याची व्यवस्था करावयाची आहे.

हवेली क्र. २ १०९३६/ ७/७८ २०२२
SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II

दिर्घ मुदतीसाठी महापालिकेकडून पाणी पुरवठा बंद राहिल्यास त्याबाबतची तक्रार लिहून देणार यांनी महामंडळास दयावी व खातरजमा करून लिहून देणार यांचे खर्चाबाबत भाडेरकमेमधून समायोजनाबाबतची कार्यवाही मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने करण्यात येईल.

२७) लिहून देणार यांनी कॅन्टिन जागेमध्ये नियमानुसार आग प्रतिबंधक उपकरणे लावण्याचे करावे.

२८) कॅन्टिनसंबंधी शासकीय अनुज्ञप्ती फी /कर इत्यादींची पूर्तता लिहून देणार यांनी करावयाची आहे.

२९) लिव्ह ॲण्ड लायसेन्स पद्वतीने केलेला करार तसेच या करारातील वरील अटीशिवाय अन्य अटिंचा समावेश करणे याबाबतीत लिहून देणार यांचे सहमतीने मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहिल.

३०) सदरचे कॅन्टिन मुख्यत्वे कामगारांसाठी असून महामंडळाच्या कामगारांच्या डयूटीनुसार ३ शिफ्टमध्ये सुरू ठेवण्यास हरकत नाही.

३१) लिव्ह ॲण्ड लायसेन्स कराराची मुदत संपुष्टात आल्यावर पुढील काळासाठी कराराची मुदत वाढवुन देणे अगर न देणे याबाबतचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना राहतील. तथापि या लिव्ह ॲण्ड लायसेन्सची मुदत वाढवुन देण्याचे ठरल्यास दरमहाचे भाडयाचे रक्कमेत वाढ करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना राहतील. पुढील कालावधीसाठी मा. उप–आयुक्त, पुणे मनपा यांचेकडुन फेरसुधारित भाडेदर ठरवुन घेण्यात येईल व तो सुधारित भाडेदर पुढील कालावधीसाठी लागु करण्यात येईल. परंतु मुदत वाढवुन न दिल्यास सदर जागेचा खुला ताबा स्वखुषीने लिहुन देणार यांनी त्वरित परिवहन महामंडळास देणे बंधनकारक राहील. याशिवाय लिहुन देणार यांस कोणत्याही प्रकारचे नुकसान भरपाई अथवा लिहुन देणार यांस करीत असलेल्या धंद्याचे लौकिक मुल्य मागण्याचा अधिकार लिहुन देणार यांस राहणार नाही.

३२ लिहुन देणार यांनी त्यांचे कामगारांना कायदेशीर देय, हक्क, जबाबदारी, पगार, कामगारांची नोंदणी कोणतीही घटना घडल्यास त्याची जबाबदारी व नुकसान भरपाई इ. तसेच कंत्राटी कामगार म्हणुन कामगाराची नोंदणी करणे बंधनकारक असल्यास सदरची नोंदणी इ. बाबींची पुर्तता लिहुन देणार यांनी करावयाची आहे. तसेच याबाबत लिहुन घेणार यांचेवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी राहणार नाही.

३३) औद्योगिक सुरक्षा कायदा अंतर्गत कॅन्टीन चालविण्यासाठी आवश्यक असलेले नियम , कायदे इ. लिहुन देणार यांचेवर बंधनकारक आहेत. सदर कायद्याचा भंग झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहिल.याबाबत लिहून घेणार यांचा काहीही संबंध राहणार नाही.

३४) लिव्ह ॲण्ड लायसेन्स पद्वतीने करण्यात आलेल्या करारनाम्यातील कोणत्याही अटीबाबत वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद हा लवादाचे माध्यमातून सोडविण्यात येईल. याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, अगर ते नेमतील ते अधिकारी हे लवाद म्हणून काम पाहतील त्यांनी दिलेला निर्णय अंतीम राहील व तो दोन्ही पक्षकारांवर बंधनकारक राहील.न्यायालयीन प्रक्रियेसाठी दिवाणी न्यायालय, पुणे यांचे ज्युरिडिक्शन राहील ही बाब लिहून देणार व लिहून घेणार यांना मान्य आहे.

३५) येणेप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसेन्स पद्वतीने घेतलेल्या जागेच्या करारनाम्यातील मजकुर लिहून देणार यांनी वाचलेला आहे व त्याचा अर्थ त्यांनी समजून घेतलेला आहे आणि तो त्यांना समजलेला आहे.सबब हा लिव्ह ॲण्ड लाससेन्स पद्वतीने घेतलेल्या जागेचा करारनामा लिहून देणार यांनी राजीखूषीने व अक्कल हूशारीने लिहून दिला असून तो त्यांच्यावर व त्यांच्या वाली वारसांवर तसेच संस्थेवर बंधनकारक राहील.

ह व ल - २
१०६३४/ ९/१५
२०२२
THE SEAL OF THE SUB REGISTRAR OF HAVELI NO. III

३६) सदर कँटीन चालू असताना परिवहन महामंडळाचे मा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याव्यतिरिक्त भेकराई नगर बस डेपो मॅनेजर व स्थानिक कर्मचारी यांचे हस्तक्षेप व अधिकार राहणार नाही. तसे केल्यास मा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी योग्य ती कारवाई करावी.

साक्षीदार:–१): नाव: Swapnil Jaglap

पत्ता: hadapsar.



लिहून देणार

श्री/श्रीमती गोवर्धन चंद्रकांत खोमणे

२): नाव Gopal Chandanshiv

पत्ता: hadapsar.



लिहून घेणार

प्रज्ञा पोतदार/पवार
सहव्यवस्थापकीय संचालक यांचे तर्फे
श्री.डी.डी.जाधव प्र.असि.विधी अधिकारी
तथा मालमत्ता विभाग,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

हवल – २
१०६३६ / १० / १०
२०२२

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF HAVELI NO. II
दुय्यम निबंधक हवेली क्र. २
२०२२